॥ मराठी असे आमुची मायबोली ॥

गायिकाः ज्योत्स्ना भोळे
गीतः माधव ज्युलीयन

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे
नसे आज ऐश्वर्य या माऊलीला यशाची पुढे दिव्य आशा असे ॥ धृ. ॥

जरी पंचखंडातही मान्यता स्वसत्ताबळे श्रीमती इंग्रजी
मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी? ॥ १ ॥

जरी मान्यता आज हिंदीस देई उदेले नवे राष्ट्र हे हिंदवी
मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणुनी योग्यता थोरवी ॥ २ ॥

असू दूर पेशावरी उत्तरी वा असू दक्षिणी दूर तांजावरी
मराठी असे आमुची मायबोली अहो ज्ञानदेवीच देखा खरी ॥ ३ ॥

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असू
पुरी बाणिली बंधुता अंतरंगी हिच्या एक ताटात आम्ही बसू ॥ ४ ॥

हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे हिला बैसवू वैभवाच्या शिरी ॥ ५ ॥